महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० मध्ये कलम ७३अअअ(३), ७३ कब (१५) व कलम १६६(४) मध्ये सुधारणा केल्या प्रकरणी दाखल रिट याचिकांमध्ये मा. उच्च न्यायालय, मुंबई येथे नेमलेल्या विधीज्ञाची फी मंजूर करण्याबाबत

महाराष्ट्र शासन
सहकार,पणन व वस्त्रोद्योग विभाग,
शासन निर्णय क्र.याचिका ०२१९/प्र.क्र.१८/का.१३ स,
हुतात्मा राजगुरू चौक,मादाम कामा मार्ग, मंत्रालय,मुंबई-४०००३२
दि. ७ ऑगस्ट, २०१९

<u>वाचा</u> :-१) विधी व न्याय विभागाचे पत्र क्र. १५२-२१९/ई दि. १२ फेब्रुवारी, २०१९
२) समक्रमांक दि. १३ फेब्रुवारी २०१९ चे पत्र.

<u>प्रस्तावना:-</u>

महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० चे कलम ७३ अअअ चे पोटकलम (३), ७३कब (१५) व १६६(४) मध्ये सुधारणा करण्यासंदर्भात दि.९/८/२०१८ च्या राजपत्रात अधिनियम प्रसिद्ध करण्यात आला. उक्त राजपत्रात प्रसिद्ध करण्यात आलेल्या आव्हान देण्यासाठी मा. उच्च न्यायालय, मुंबई येथे विविध याचिका दाखल करण्यात आल्या आहेत. मा. उच्च न्यायालय, मुंबई, नागपूर खंडपीठ येथे राजेंद्र हिरालाल जैन यांनी दाखल केलेल्या रिट यांचिका क्र.८४३३/२०१८ मध्ये शासनाची बाजू मांडण्यासाठी ॲड. सुबोध धर्माधिकारी, ज्येष्ठ विधिज्ञ म्हणून उपरोक्त वाचा क्र. २ अन्वये नियुक्ती करण्यात आली आहे.

उक्त रिट याचिकांमध्ये मा. उच्च न्यायालयात दि.१४/०२/२०१९ रोजी झालेल्या सुनावणीवेळी ॲड. धर्माधिकारी मा. उच्च न्यायालयात उपस्थित होते. सदर सुनावणीकामी वकील फी म्हणून त्यांनी आकारलेले व शासनास सादर केलेले वकील फीबाबतचे शुल्क अदा करण्याची बाब सदर नस्तीवर विचाराधीन होती.

शासन निर्णय:-

मा. उच्च न्यायालय, मुंबई, नागपूर खंडपीठ येथे महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० चे कलम ७३ अअअ चे पोटकलम (३), ७३कब (१५) व १६६(४) मध्ये सुधारणा करण्यासंदर्भात दि.९/८/२०१८ च्या राजपत्रात अधिनियम प्रसिद्ध करण्यात अध्यादेशाविरुध्द दाखल रिट याचिकांमध्ये शासनाची बाजू मांडण्यासाठी मा. उच्च न्यायालय, मुंबई नागपूर खंडपीठ येथे नियुक्त केलेले ॲड. सुबोध धर्माधिकरी ,ज्येष्ठ विधीज्ञ यांनी सादर केलेल्या देयकाच्या अनुषंगाने उपलब्ध निधीमधून त्यांचे वकील फीचे शुल्क खालीलप्रमाणे अदा करण्यास मंजूरी देण्यात येत आहे.

अ.क्र.	विधिज्ञाचे नांव	सादर केलेल्या देयकाची रक्कम (रुपये)	१०% आयकराची रक्कम (रुपये)	आयकर रकमेवर ४% शिक्षण निधी	कपातीची एकूण रक्कम रकाना क्र. ४ +५	एकूण देय रक्कम
१.	२.	३.	४.	५.	६	
१.	ॲड. सुबोध धर्माधिकारी	२,०५,०००/-	२०,५००/-	८२०/-	२१,३२०/-	१,८३,६८०/-

२. या शासन निर्णयान्वये मंजूर करण्यात आलेली रु. १,८३,८८५/- (रुपये एक लक्ष त्र्याऐंशी हजार आठशे पंच्याऐंशी) इतकी रक्कम Mr. Subhodh Dharmadhikari Account number- 0604040000029 , IFSC Code-BARB०AMBAZA , MICR CODE- यांचे नांवे RTGS करण्यात यावी. त्यांचा पॅन क्रमांक ABIPD6312P असा आहे.

३. सदर रक्कम वितरित करण्याकरीता श्री. र.ग. बोडडू, कार्यासन अधिकारी (रोख शाखा) सहकार,पणन व वस्त्रोद्योग विभाग, मंत्रालय, मुंबई यांना आहरण व संवितरण अधिकारी म्हणून घोषित करण्यात येत आहे. तसेच डॉ. सुदिन गायकवाड, उपसचिव (आस्थापना), सहकार,पणन व वस्त्रोद्योग विभाग, मंत्रालय, मुंबई यांना नियंत्रण अधिकारी म्हणून घोषित करण्यात येत आहे.

४. यासाठी येणारा खर्च या विभागाच्या मागणी क्र.व्ही-२, ३४५१-सचिवालयीन आर्थिक सेवा (०९०) सचिवालय (०१) (०१) सहकार,पणन व वस्त्रोद्योग विभाग (दत्तमत्त) (३४५१ ०३०४)२८ व्यावसायिक सेवा या लेखाशिर्षाखाली सन २०१९-२० या आर्थिक वर्षासाठी पुनर्विनियोजनेद्वारे प्राप्त झालेल्या तरतूदीतून भागविण्यात यावा .

५. सदर शासन निर्णय, वित्त विभागाच्या वित्तीय अधिकारी नियम पुस्तिका १९७८ भाग पहिला उपविभाग दोन अनु. क्र. ४९ नियम क्र. १६६ अन्वये प्रशासकीय विभागांना असलेल्या अधिकारांतर्गत निर्गमित करण्यात येत आहे.

६. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध असून त्याचा संकेतांक २०१९०८०७१५२९५०६३०२ असा आहे. हा आदेश डिजिटल स्वाक्षरीने साक्षांकित करून काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नांवाने,

Chaudhary Anil Jayaram

Digitally signed by Chaudhary Anil Jayaram
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Co-Operation Marketing and Textile, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=f26cf80358fa3133e4d85ddac30ae54b06c63743fd5510dc0ebca082b6c483ce, cn=Chaudhary Anil Jayaram
Date: 2019.08.07 15:34:52 +05'30'

(अनिल ज. चौधरी)
कार्यासन अधिकारी,महाराष्ट्र शासन

प्रत :-

१) मा. प्रधान सचिव (सहकार), सहकार,पणन व वस्त्रोद्योग, विभाग, मंत्रालय, मुंबई यांचे स्वीय सहाय्यक
२) महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता/लेखा परीक्षा) महाराष्ट्र-१, मुंबई.
३) अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई
४) अवर सचिव (१७-स), सहकार,पणन व वस्त्रोद्योग विभाग, मंत्रालय , मुंबई ३२.
५) कक्ष अधिकारी (रोख शाखा) सहकार,पणन व वस्त्रोद्योग विभाग, मंत्रालय यांना पुढील योग्य त्या कार्यवाहीसाठी.
६) वित्त विभाग कार्या.व्यय- २ व अर्थ -१३, मंत्रालय.
७) ॲड. सुबोध धर्माधिकारी, प्लॉट नं.९१, फ्लॅट नं.१०१, पहिला मजला, श्रीनिधी आर्केड, शंकरनगर, नागपूर-४४००१०.
८) निवडनस्ती १३-स